# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)

**३२ वा मजला, सेंटर -१ बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दुरध्वनी : (०२२) ६९९६५५५५ फॅक्स : २२१५१६७ ई-मेल : info.mahasecurity@maharashtra.gov.in / dirrecruitment.mahasec@gmail.com

**जा.क्र.मरासुम/भरती/ ३५७३ /२०२४** **दिनांक : ०३/१२/२०२४**

## -: कार्यालयीन आदेश :-

## सुरक्षा रक्षक (कंत्राटी) निकष पडताळणी-२०२४ उमेदवारांसाठी सुचना

१. उमेदवारांची दिनांक निहाय यादी महामंडळानी दिलेल्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

२. उमेदवारांनी दिनांक निहाय यादी प्रमाणे सकाळी १०.०० वा. महामंडळाचे निकष पडताळणीसाठी गणेश हॉल सशस्त्र पोलीस मुख्यालय मरोळ, मुंबई येथे हजर रहावे. (दुपारी ०३.०० वा. नंतर उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.)

३. निकष पडताळणीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल. निकष पडताळणी केंद्रावरती उमेदवारांसाठी कोणतीही व्यवस्था महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून केली जाणार नाही.

४. उमेदवारांनी आपल्या नातेवाईकांना निकष पडताळणी केंद्रावर आणू नये. फक्त उमेदवारांनाच निकष पडताळणीसाठी प्रवेश दिला जाईल.

५. उमेदवारास दिलेल्या दिनांकास अपवादात्मक परिस्थितीत (इतर तातडीचे काम) निकष पडताळणीस हजर राहणे शक्य नसल्यास प्रसिध्द केलेल्या यादीतील दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी ते हजर राहू शकतात. परंतु दिनांक २०/१२/२०२४ रोजी शेवटचा दिवस असून त्या दिवशीही गैरहजर राहील्यास त्यानंतर त्यांना पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही. व निकष पडताळणी २०२४ करीता विचार केला जाणार नाही.

६. उमेदवारांनी निवासाची व्यवस्था स्वत: करावी. निकष पडताळणीसाठी दिलेल्या दिनांक व वेळेस हजर रहावे. त्यापुर्वी कोणीही भरतीसाठी दिलेल्या केंद्राच्या ठिकाणी येऊ नये. सदर ठिकाणी वेळेच्या आधी आल्यास तेथे प्रवेश दिला जाणार नाही. तसेच ज्या उमेदवारांना मोबाईलवर संदेश प्राप्त झालेला आहे. किंवा वेबसाईटवर प्रसिध्द यादीत ज्यांचे नावे आहे, त्यांनीच सदर ठिकाणी हजर राहवे व इतरांना प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. उमेदवारांनी १०/१२ वी पास गुणपत्रिका व प्रमाणपत्र, / जन्म दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र / शाळा सोडण्याचा दाखला / आधार कार्ड / पॅन कार्ड / अधिवास प्रमाणपत्र / वाहन चालवण्याचा परवाना (असल्यास) / मुळ प्रती सोबत आणावेत. **तसेच सोबत पोलीस भरती मध्ये मैदानी व लेखी परिक्षेस हजर राहील्याबाबतची (प्रवेश पत्र) कागदपत्राच्या मुळ व छायांकित प्रती सोबत आणाव्यात.**

८. जे उमेदवार यापुर्वी महाराष्ट्र सुरक्षा बलात कार्यरत आहेत / किंवा कार्यरत होते. व त्यांची सेवा कसुरीमुळे समाप्त करण्यात आली आहे. किंवा करार खंडीत करण्यात आला आहे. किंवा या पुर्वी प्रशिक्षणास पाठवण्यात आले होते. परंतु राजीनामा, गैरहजर किंवा भगोडा या कारणामुळे प्रशिक्षण सोडून गेलेले किंवा प्रशिक्षण पुर्ण केलेले असून महामंडळाच्या नेमणूक प्रतिक्षाधीन यादीवर आहेत. असे उमेदवार सन- २०२१ च्या पोलीस भरतीस हजर राहलेले आहेत. त्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर संदेश मिळाला किंवा वेबसाईटवर प्रसिध्द यादीत त्यांचे नावे असले तरी, त्यांनी भरती नोंदणीसाठी हजर राहु नये. हजर राहील्यास त्यांना अपात्र ठरवण्यात येईल. तसेच दिशा भुल करुन महामंडळात पुन्हा नेमणूक मिळवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२.../-

www.MahaBharti.in

९. उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर संदेश देण्यात आलेला https://mssc.co.in/application/index.php ही लिंक ओपन करुन तेथे दिलेला फॉर्म ऑनलाईन व्यवस्थीत भरणे आवश्यक आहे. तसेच सदर लिंक ओपन केल्यानंतर **(Privacy Policy)** यावर क्लिक करुन तेथील दिलेल्या सुचना प्रमाणे फॉर्म काळजीपुर्वक भरण्यात यावा. तसेच फॉर्म मध्ये दिलेल्या जागी स्वत: चे अलीकडील काळातील रंगीत छायाचीत्र व सही अपलोड करावी, तसेच मुद्दा क्र. ७ मध्ये नमुद सर्व आवश्यक कागदपत्रे दिलेल्या जागी अपलोड करावी. संपुर्ण माहिती भरल्यानंतरच फॉर्म सबमीट करण्यात यावा. तसेच नोंदणीच्या दिवशी येतांना फॉर्मची प्रिंट काढून सोबत आणावी. तसेच सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे सोबत आणावी.

१०. उमेदवार नोंदणीसाठी हजर राहतांना दिलेल्या लिंकवर फॉर्म भरलेला नसल्यास व येतांना त्याची प्रिंट व मुळ कागदपत्रे सोबत न आणल्यास त्यास अपात्र समजण्यात येईल, व त्याची नोंदणी होणार नाही, याची नोंद घ्यावी.

११. ज्या उमेदवारांनी यापुर्वी ऑनलाईन पध्दतीने भरती नोंदणीचा फॉर्म भरला असेल, परंतु त्यांना प्रतिक्षाधीन (Waiting) ठेवण्यात आलेले आहे. अशा उमेदवारांनी नोंदणीच्या ठिकाणी येऊन आपले अपुर्ण असलेल्या कागदपत्राची पुर्तता केल्यास त्यांची नोंदणी केली जाईल, याची नोंद घ्यावी.

१२. भरती प्रकिये मध्ये पात्र झाल्यानंतर उमेदवाराला प्रशिक्षणासाठी हजर राहण्यासाठी त्यांचे नोंदणीच्या वेळी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश देण्यात येतील. महामंडळाने दिलेल्या दिनांक व वेळेस संबंधित प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी हजर राहताना खालील बाबीची पुर्तता करावी लागेल.

**अ)** उमेदवाराचा नियुक्ती पुर्व मुलभुत प्रशिक्षणाचा कालावधी ४५ दिवसाचा असेल व महामंडळाने ठरविलेल्या महाराष्ट्रातील कोणत्याही ठिकाणच्या प्रशिक्षण केंद्रात त्यास प्रशिक्षणास पाठविण्यात येईल त्या ठिकाणी त्यास वेळेस हजर राहावे लागेल.

**ब)** प्रशिक्षणास हजर राहताना प्रशिक्षण शुल्क म्हणुन सुरक्षा अनामत रक्कम रु. १५,०००/- भरणा करावी लागेल. (त्यापैकी रु. १०,०००/- Non-Refundable आणि रु. ५,०००/- Refundable असतील. सदरची Refundable रक्कम उमेदवारास नियुक्तीसाठी संदेश दिल्यानंतर नियुक्ती तात्काळ स्विकारल्यानंतर व एक करार कालावधी पुर्ण केल्यानंतरच परत करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.)

**क)** उमेदवारास प्रशिक्षणासाठी हजर होण्याचा संदेश आल्यास प्रशिक्षण केंद्रावर हजर होताना प्रशिक्षणास सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. भरती नोंदणी झाल्यानंतर सदरच्या कागदपत्राची पुर्तता करण्यात यावी.

जरी उमेदवार भरती नोंदणीसाठी पात्र ठरला तरी एखाद्या उमेदवारा विरुध्द गुन्हा नोंद असल्याबाबत किंवा इतर आक्षेपार्ह चारित्र्य पडताळणी अहवाल असल्यास सदर उमेदवारास प्रशिक्षण संधी देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

03/12

(अश्विनी सानप, *भा.पो.से.*)
**पोलीस अधिक्षक तथा महाव्यवस्थापक**
**(भरती व प्रशिक्षण) अति. कार्यभार पोलीस उपमहानिरीक्षक**
**तथा उपव्यवस्थापकीय संचालक (प्रशासन)**
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION, M. S. MUMBAI - 400

**<u>टिप :-</u> गणेश हॉल, सशस्त्र पोलीस दल मुख्यालय मरोळ, मुंबई हे ठिकाण घाटकोपर रेल्वे स्टेशन येथून मेट्रोने मरोळ नाका मेट्रो स्टेशन येथून जवळ आहे, व तेथून रिक्षा उपलब्ध होऊ शकतात. तसेच अंधेरी रेल्वे स्टेशन येथून मरोळ मुख्यालयसाठी बेस्ट बसेस / रिक्षा उपलब्ध होऊ शकते.**

www.MahaBharti.in